# दिव्यांग उमेदवार :- लेखनिक व भरपाई वेळ बाबत
# मार्गदर्शक सूचना

१. फक्त अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल प्लासी, डिस्लेक्सियाने बाधित व किमान ४० टक्के कायमस्वरुपी दिव्यांगत्व असलेल्या पात्र उमेदवारांना, ते लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास, परीक्षा प्रयोजनार्थ गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल व भरपाई वेळ अनुज्ञेय राहील.

२. प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसलेल्या पात्र दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची मदत आणि / अथवा भरपाई वेळेची आवश्यकता असल्यास संबंधित उमेदवाराने तो राहत असलेल्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी / निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज सादर करुन पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

३. ऑनलाईन अर्जामध्ये मागणी केली नसल्यास तसेच सक्षम प्राधिकाऱ्याची विहित पध्दतीने पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही. अथवा अनुग्रह कालावधी अनुज्ञेय असणार नाही.

४. किमान ४०% दिव्यांगत्व असलेल्या, तसेच लिहिण्यासाठी कायमस्वरुपी वेगावर मर्यादा असल्याबाबत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र.दिव्यांग २०१९/प्र.क्र२००/दि.क.२ दि.०५ ऑक्टोंबर२०२१ अन्वये विहित केलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र (**APPENDIX – I) (APPENDIX – II)** सादर करणाऱ्या उमेदवारांनाच लेखनिकाची सेवा अथवा भरपाई वेळ देण्याबाबत विचार करण्यात येईल.

५. उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावी व त्याच्या मानधनाची व्यवस्था उमेदवारास करावी लागेल.

६. परीक्षेच्या वेळी उमेदवार तसेच लेखनिक यांनी लेखनिकाच्या फोटोसह संयुक्त हमीपत्र / घोषणापत्र देणे आवश्यक आहे.

७. विहित नमुन्यात संपूर्ण भरलेले हमीपत्र / घोषणापत्र उमेदवाराने जिल्हाधिकारी / निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडून प्रतिस्वाक्षरीत करुन परीक्षा सुरु होण्यापुर्वी समवेक्षक / केंद्र संचालकास तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य राहील त्याशिवाय लेखनिकाची व्यवस्था अनुज्ञेय ठरणार नाही.

८. उमेदवाराने स्वतः व्यवस्था केलेल्या लेखनिकाच्या गैरवर्तनाची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहिल. लेखनिक व उमेदवार यांच्यामधील संभाषणामुळे परीक्षेची शांतता कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही अथवा इतर उमेदवारांची एकाग्रता भंग होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

९. परीक्षा निवड समितीकडून अथवा पर्यवेक्षकीय यंत्रणेकडून देण्यात आलेल्या सुचनांचे उल्लंघन केल्यास उमेदवार व लेखनिकावरील इतर कायदेशीर कारवाईसह संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

**१०.** लेखनिकाने स्वतः प्रश्न सोडवू नये अथवा उमेदवारास कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन वा सूचना करू नयेत. उमेदवाराकडून तोंडी सूचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमूद करणे एवढेच आवश्यक राहील.

**११. भरपाई वेळ**

अ. फक्त अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल प्लासी आणि डिस्लेक्सियाने बाधित उमेदवार यांनाच भरपाई वेळ अनुज्ञेय राहील.

ब. सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेले विहित नमुन्यातील वैद्यकीय प्रमाणपत्र **(APPENDIX – I)** परीक्षेचे वेळी सादर करणाऱ्या उमेदवारांच अनुग्रह कालावधीची परवानगी देण्यात येईल.

क. प्रत्येक तासाला २० मिनिटे याप्रमाणे अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

ड. भरपाई वेळ मागणी करणाऱ्या उमेदवाराने जिल्हाधिकारी कार्यालयाकडील प्रमाणपत्र परीक्षेच्या वेळी सोबत आणणे तसेच परीक्षा सुरु होण्याच्यापुर्वी समवेक्ष / केंद्रसंचालक यांचेकडे देणे अनिवार्य राहील.

ई महा भूमि

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य ) , पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधानभवनसमोर , कॅम्प , पुणे
दूरध्वनीक्र. ०२०-२६१३७११ Email ID:dycoll.talathirec2023@gmail.comWeb site: https://mahabhumi.gov.in

जा.क्र./तलाठी भरती/प्र.क्र/१०९/२०२३ दि. ०७/०७/२०२३

**विषय :- महसूल विभागातील गट- क संवर्गातील तलाठी भरती सन २०२३ बाबत.**
लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देणेबाबत.

**-परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.पदानि-२०२२/प्र.क्र२/२०२२/आ.पु.क दि.३१/१०/२०२२ अन्वये पदभरतीतील निर्बंध शिथील करण्यात आलेले असून महसूल विभागातील गट - क संवर्गातील तलाठी पद भरतीची कार्यवाही या कार्यालयामार्फत करणेत येत आहे.

महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.दिव्यांग २०१९/ प्र.क्र.२००/ दि.क. २ दिनांक ०५ ऑक्टोबर २०२१ अन्वयेलक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिक व इतर सोयी सवलती उपलब्ध करून देणेबाबत जारी करणेत आलेल्या लक्षणीय (Benchmark) दिव्यांग व्यक्तींच्या बाबत लेखी परीक्षा घेणेबाबतची मार्गदर्शिका-२०२१ तसेच तद्नंतरचे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करणेबाबतचे या कार्यालयाकडून दि. २६/०६/२०२३ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात तसेचसंकेतस्थळावर प्रसिध्दी देणेत आलेली आहे.

सदर जाहिरात प्रसिध्द होताच या कार्यालयाकडे मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण व शहरी भागातून दिव्यांग अर्जदार यांनी वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने परीक्षेच्या दिवशी त्यांनाअनुग्रह कालावधी तसेच परीक्षेच्या वेळी लेखनिकाची सोय उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली आहे.

तलाठी भरतीचे ऑनलाईन प्रणालीवरती अर्ज करण्याची शेवटची तारीख १७/०७/२०२३ असल्याने सदर तारखेपर्यंत वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने दिव्यांग अर्जदार यांचे मोठ्या प्रमाणावर अनुग्रह कालावधी व लेखनिक मिळणेबाबत अर्ज येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब याव्दारे सर्व उपायुक्त (महसूल), सर्व जिल्हाधिकारी तसेच सर्व तहसिलदार यांना कळविणेत येते की या कार्यालयामार्फत आपलेकडे पाठविणेत आलेले प्रस्ताव तसेच आपलेकडे प्राप्त झालेले प्रस्तावाबाबत उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपले स्तरावर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणेत यावी. तसेच त्याबाबत संबंधित अर्जदार यांना देखील कळविणेत यावे. आपले कार्यालयाकडे प्राप्त झालेले दिव्यांग उमेदवारांचे अर्जाची माहिती या कार्यालयास आपले कार्यालयाच्या ईमेलवर पाठविणेत आलेल्या गुगलशीट मध्ये भरून सादर करावी.

**(आनंद रायते)भा.प्र.से.**
**अपर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्तसंचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे**

**प्रति,**
सर्व उपायुक्त (महसूल),
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व तहसिलदार

**APPENDIX - I**

## Certificate regarding physical limitation in an examinee to write

This is to certify that, I have examined Mr/Ms/Mrs …………………………………………………………(Name of the Candidate with disability), a person with …………………………………………………………… (Nature and percentage of disability as mentioned in the certificate of disability), S/o/D/o………………………………………, a resident of ………………………………………………………………………………………(Village/District/State) and to state that he/she has physical limitation which hampers his/her writing capabilities owing to his/her disability.

Signature

Chief Medical Officer/Civil Surgeon/Medical Superintendent of

a Government health care institute

Name and Designation

Name of Government Hospital/Health Care Centre with Seal

Place:-

Date:-

Note:- Certificate should be given by a specialist of the relevant stream/disability (eg. Visual impairment – Ophthalmologist, Locomotor disability – Orthopaedic specialist/PMR).

## APPENDIX - II

## Letter of Undertaking for Using Own Scribe

I……………………………………………………………………, a candidate with …………………………………(Name of the disability) appearing for the ……………………………………………………………………………(Name of the examination) bearing Roll No………………..at…………………………………………………………………………(Name of the Sub-Centre) in the District……………………………, Maharashtra. My qualification is………………………………….

I do hereby state that………………………………………………………… (Name of the Scribe) will provide the service of Scribe/Reader/Lab Assistant for the undersigned for taking the aforesaid examination.

I do hereby undertake that his qualification is …………………………………………………In case, if it is found that scribe's qualification is not as declared by the undersigned or is equal to or higher than my qualification or if found to be more than or equal to the minimum qualification criteria of the examination. I shall forfeit my right to the post and claims relating thereto.

(Signature of the candidate with Disability)

Place:-

Date:-